महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर

**बार्टी, राष्ट्रीय सेवा योजना, हिंदी व राज्यशास्त्र आणि IQAC विभाग**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

***आयोजित***

# “संविधान जागर”

**गुरुवार, दि.04 डिसेंबर, 2025**

### कार्यक्रम पत्रिका

**स्वागत आणि प्रास्ताविक : डॉ. प्रकाश आठवले**

**प्रमुख अतिथी : मा. अरुण पाटील**

(पोलिस उपअधीक्षक, इस्लामपूर पोलिस ठाणे)

**प्रमुख उपस्थिती : मा. गणेश सवाखंडे**

(जिल्हा प्रकल्प अधिकारी, बार्टी संस्था)

**मा. अंकुश चव्हाण**

(समता दूत तथा तालुका प्रमुख वाळवा)

**डॉ. पी. व्ही. गायकवाड**

(उपप्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर)

**प्रा. संतोष पाटील**

(उपप्राचार्य, ज्यु. विभाग कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर)

**प्रा. डॉ. एस. के. माने**

(समन्वयक, IQAC विभाग )

**अध्यक्ष मनोगत : प्रा.डॉ. नितीन शिंदे**

(प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर)

**आभार : सौ. ज्योती कथलकर**

**सूत्रसंचालन : प्रा. अश्विनी थोरात, प्रा. वंदना पाटील**

---

**स्थळ : G-14** **वेळ : सकाळी 9.30 वा.**

# “संविधान जागर” उपक्रम अहवाल

दि. 04 डिसेंबर, 2025

आपणा सर्वांना ज्ञात आहे की, जगात तीन घटना समितीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामध्ये अमेरिकन घटना समिती, फ्रेंच घटना समिती व भारतीय घटना समिती या तिन्ही घटना समितीच्या मध्ये भारतीय राज्यघटना समितीला विशेष महत्त्व आहे. कारण जगातील कोणत्याच घटना समितीत कलमांची तरतूद करताना तत्वज्ञानात्मक चर्चा करण्यात आलेली नाही. मात्र भारतीय घटना समितीत प्रत्येक कलमावर विस्तारपूर्वक आणि तत्त्वज्ञानात्मक स्तरावर चर्चा होऊन व मतदान प्रक्रिया पूर्ण करून  बहुमताच्या आधारे प्रत्येक कलम स्वीकृत करण्यात आलेले आहे.

भारतीय राज्यघटना एक साधन असून त्या माध्यमातून सामान्य माणसांच्या जीवनात परिवर्तन घडवून यावे ही घटनाकारांची अपेक्षा होती. अतिशय प्रदीर्घ आणि उच्च प्रतीची सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या भारतीय समाजाला सामर्थशाली ऊर्जेची आणि विवेकाची गरज आहे, असा घटनाकारांचा विश्वास होता. त्याकरिता राज्यघटनेत आवश्यक त्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. उदा. संसदीय शासन प्रणाली, सार्वत्रिक व प्रौढ मताधिकार, मूलभूत अधिकार, राज्य ध्येयधोरणाची मार्गदर्शक तत्वे आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था इ. भारतीय राज्यघटना हे आदर्श व मानवी अशा तत्त्वावर आधारित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इशारा दिला होता की, आपल्या देशात काही चुकीचे घडले तर त्यात दोष राज्यघटनेचा नसेल तर तो राबवणाऱ्या माणसांचा असेल. कारण राजघटना कितीही वाईट असली आणि ती राबवणारे चांगले असतील तर वाईट राज्यघटनाही चांगली सिद्ध होऊ शकते आणि राज्यघटना कितीही चांगली असली आणि ती राबविणारे वाईट असतील तर चांगली राज्यघटना सुद्धा वाईट सिद्ध होऊ शकते म्हणून राजघटना राबविणाऱ्यांची नियत चांगली असायला हवी.

तरी सर्व विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची ओळख व्हावी, त्यातील मूलभूल अधिकार व कर्तव्य यांची जाणीव व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्यायाची भावना रुजवावी या उद्देशाने ‘घर घर संविधान’ हा उपक्रम शासनातर्फे राबविण्यात येत आहे. या अनुषगाने आपल्या महाविद्यालयात “संविधान जागर” उपक्रम साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा.अरुण पाटील, मा. सागर सवाखंडे, मा. अंकुश चव्हाण,  कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.




भारतीय संविधान उद्देशिकेचे महत्त्व विशद मा. अंकुश चव्हाण




भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करताना सांगली जिल्हा प्रकल्प अधिकारी बार्टी पुणे मा. गणेश सवाखंडे




संविधान जागर उपक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे




संविधान जागर उपक्रमाचे आभार व्यक्त करताना सौ. ज्योती कथलकर